सत्यमेव जयते

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

१ ला माळा, नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई-४०० ०३२.

क्रमांक:रानिआ/रापनों-२०२४/प्र.क्र.२४/का.११, दि. २५ नोव्हेंबर २०२५

**संदर्भ:** राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र. रानिआ/रापनों-२०२४/प्र.क्र.२४/का.११, दि. ५ मे २०२५.

ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद '२४३ ट' (243K) आणि '२४३ यक' (243ZA) अन्वये; तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या संबंधित कायद्यांतील तरतुदींन्वये राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सर्व निवडणुकांचे अधीक्षण, संचालन व नियंत्रण याबाबतचे अधिकार राज्य निवडणूक आयोगास प्राप्त झालेले आहेत;

ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाने सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका मुक्त, निर्भय व पारदर्शक वातावरणात पार पाडाव्यात, यासाठी 'महाराष्ट्र राज्य राजकीय पक्ष नोंदणी, विनियमन आणि निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश, २०२५' (रानिआ/रापनों-२०२४/प्र.क्र.२४/का.११दि. ५ मे २०२५) निर्गमित केला आहे.

त्याअर्थी, उक्त आदेशामध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करणे आवश्यक असल्याची राज्य निवडणूक आयोगाची खात्री झाल्याने आणि उक्त आदेशातील परिच्छेद २७ मधील राज्य निवडणूक आयोगास प्राप्त अधिकारान्वये खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

उक्त आदेशातील परिच्छेद १४ मधील आधीच्या तरतुदी रद्द करून, खालीलप्रमाणे सुधारित तरतुदी समाविष्ट करण्यात येत आहेत:

### या आदेशाच्या आधीची तरतूद

***"१४. यथास्थिती महापौर व नगरपरिषद, नगरपंचायतीच्या अध्यक्षपदाच्या थेट निवडणुकीबाबत:***

*(१) यथास्थिती महापौर किंवा नगरपरिषद/ नगरपंचायतींच्या अध्यक्षपदासाठी थेट निवडणूक होत असल्यास, सुरुवातीला महापौर/ अध्यक्षपदाच्या उमेदवारांना प्राधान्याने चिन्ह वाटप केले जाईल. त्यांना वाटप केलेली चिन्हे मुक्त चिन्हांपैकी असल्यास त्या मुक्त चिन्हांचे वाटप सदस्यपदाच्या इतर कोणत्याही उमेदवारांना केले जाणार नाही.*

*परंतु, एखादा उमेदवार महापौर/ अध्यक्षपदासोबत सदस्यपदाची निवडणूक लढवत असल्यास, त्या उमेदवारास महापौर/ अध्यक्षपदाकरिता वाटप करण्यात आलेले चिन्ह त्याने*

*मागणी केल्यास, तो निवडणूक लढवत असलेल्या प्रभागांतील सदस्यपदांकरितादेखील देण्यात येईल."* **या ऐवजी,**

**<u>सुधारित तरतूद</u>**

***"१४. यथास्थिती महापौर व नगरपरिषद, नगरपंचायतीच्या अध्यक्षपदाच्या थेट निवडणुकीबाबत:***

*(१) यथास्थिती महापौर किंवा नगरपरिषद/ नगरपंचायतींच्या अध्यक्षपदासाठी थेट निवडणूक होत असल्यास, सुरुवातीला महापौर/ अध्यक्षपदाच्या उमेदवारांना प्राधान्याने चिन्ह वाटप केले जाईल. एखाद्या नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाच्या महापौर/ अध्यक्षपदाच्या उमेदवारास वाटप केलेले चिन्ह मुक्त चिन्हांपैकी असल्यास आणि तो उमेदवार त्याच नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाकडून सदस्यपदाचीही निवडणूक लढवित असल्यास त्या उमेदवाराने त्याच्या नामनिर्देशनपत्रात त्याच मुक्त चिन्हाची मागणी केली असल्यास, त्याला त्या मुक्त चिन्हाचे थेट वाटप करावे.*

*(२) एखाद्या नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षाकडून महापौर/ अध्यक्षपदाची निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारास वाटप करण्यात आलेले चिन्ह हे मुक्त चिन्हांपैकी असल्यास त्या मुक्त चिन्हाचे नोंदणीकृत अमान्यताप्राप्त राजकीय पक्षांच्या सदस्यपदांच्या उमेदवारांना त्यांच्या नामनिर्देशनपत्रातील मागणीनुसार परिच्छेद १३ आणि १५(२)(क) मधील तरतुदीनुसार वाटप करण्यात येईल.*

*(३) एखादा अपक्ष उमेदवार महापौर/ अध्यक्षपदाच्या निवडणुकीसोबत सदस्यपदाचीही निवडणूक लढवित असल्यास त्या उमेदवारास महापौर/ अध्यक्षपदाकरिता वाटप करण्यात आलेल्या मुक्त चिन्हाचे त्याच्या नामनिर्देशनपत्रातील मागणीनुसार सदस्यपदासाठीदेखील थेट वाटप करण्यात येईल; परंतु त्या उमेदवारास वाटप केलेल्या मुक्त चिन्हाचे सदस्यपदाच्या इतर कोणत्याही नोंदणीकृत अमान्याताप्राप्त राजकीय पक्ष किंवा अपक्ष उमेदवारास वाटप केले जाणार नाही."*

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

**(राजेंद्र पाटील)**
उपायुक्त
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र